ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS

Original Research Article

# ‘खाणमाती’(विठ्ठल गावस) : मन विषण्ण करणारे वास्तव

*डॉ. वर्षा शरीष फाटक,

* आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय, देवरुख, ता. संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी ४१५८०४

जागतिकिकरण, औद्योगिकीकरण यामुळे भांडवलशाहांनी आमलात आणलेल्या विकासाच्या अगणित योजना आणि त्याखाली भरडला जाणारा, विस्थापित ग्रामीण समाज याचे चित्र अनेक कादंबऱ्यातून अतिशय प्रत्ययकारीपणे रेखाटले गेले. महात्मा गांधीनी तरुणांना, ‘खेड्याकडे चला’ असा संदेश दिला. त्यामागे त्यांचा हेतू खेड्यांचा विकास, निसर्गसमृद्ध अशा खेड्यांमधील साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन करत तरुणांनी खेडी विकसित करून राष्ट्राच्या विकासाला हातभार लावावा हा होता. पण याउलट जेव्हा खेड्यांमध्ये तिथल्या साधनसंपत्तीच्याच मुळांवर आघात करत औद्योगिकिकरणाच्या नव्या संकल्पनांच्या अंमलबजावणीमुळे खेडी भकास होत गेली. खेड्यांमध्ये राहणाऱ्या शेतकरी, कष्टकरी समाजाला विस्थापन, बेरोजगारीसारख्या समस्यांना सामोरे जावे लागले. त्यांची आयुष्य त्यांच्या निसर्गसंपन्न भूमीसह उध्वस्त झाली. त्याचीच चित्रे अनेक कथा कादंबऱ्यातून अतिशय गांभीर्याने रेखाटली गेली. त्यापैकीच एक गोव्यातील लेखक विठ्ठल गावस यांची ‘खाणमाती’ कादंबरी होय. निर्सगसंपन्न गोव्याच्या भूमीत स्थापन केलेल्या खाणउद्योगामुळे तेथील शांत, समृद्ध जीवनाला कसा सुरुंग लावला गेला त्याचे मन सुन्न करून टाकणारे दर्शन या कादंबरीत घडते.

विकासाच्या नावाखाली निर्माण होणाऱ्या खनिज उद्योगप्रकल्पात निसर्गसमृद्ध जीवन पूर्ण उध्वस्त होत गेले. खेड्यांमध्ये प्राप्त झालेल्या भौगोलिक व नैसर्गिक संपन्नतेवर तेथील माणूस अतिशय समाधानाचे जीवन जगत होता. जेव्हा भांडवलशहांनी आपली नजर खेड्यांकडे वळवली, तेव्हा तिथल्या समाजाला पैशांची, रोजगाराची, भौतिक सुखाची लालूच दाखवत त्यांनी आपले औद्योगिक साम्राज्य स्थापन करायला सुरुवात केली. सत्तेच्या आणि पैशाच्या बळावर भांडवलशहा सामान्य माणसांचे शोषण करू लागले. आत्तापर्यंत झाडाझडती, ‘११ कोटी गॅलन पाणी’, ‘आकांत’, ‘एस.ई.झेड’, ‘मेड इन चायना’, ‘बारोमास’ सारख्या कादंबऱ्याप्रमाणेच ‘खाणमाती’ या विठ्ठल गावस यांच्या कादंबरीत देखील ग्रामजीवनावर शहरीकरण व औद्योगिकीकरण याचे झालेले भीषण परिणाम प्रत्ययास येतात.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

गोवा ही अतिशय निसर्गसंपन्न अशी भूमी. परंतु जेव्हापासून औद्यगिकीकरणाचे वारे या प्रदेशात वाहू लागले तेव्हा तांबड्या मातीच्या डोंगरात सापडलेल्या खनिजाकडे भांडवलदारांचे लक्ष आकृष्ट झाले. तिथल्या राजकरण्याना

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

हाताशी धरून भूमिपुत्रांकडून लागवडीखालील डोंगरजमीन पैशाची लालूच दाखवून मोठ्या प्रमाणात हस्तगत करायला सुरवात झाली आणि निसर्गसंपन्न अशा कोकण भूमीचे विरूपीकरण सुरू झाले. आधीच उभ्या राहिलेल्या पर्यटन उद्योगामुळे बकाल होऊ लागलेला गोवा आता खाणीमुळे अधिकाधिक उद्ध्वस्त होऊ लागला. संवेदनशील कार्यकर्ते व लेखक यांनी यामुळे निर्माण झालेल्या भीषण प्रश्नांकडे अत्यंत गांभीर्याने जनतेचे लक्ष वेधायला सुरुवात केली. लेखक गजानन देसाई यांनी आपल्या 'ओरबिन' या कादंबरीत हाच प्रश्न मांडला. तसेच विठ्ठल गावस यांनी गोव्यात निर्माण झालेली चंगळवादी संस्कृती आणि भूमिधारकांचे प्रश्न, बेरोजगारीमुळे निर्माण झालेली परिस्थितीशरणता, सत्ताधाऱ्यांचे डावपेच व मुजोरी, सरकारी अधिकाऱ्यांचे लांघुलचालन यामध्ये भरडला जाणारा शेतकरी व उध्वस्त होत गेलेली कृषिसंस्कृती या सर्वांचे अतिशय प्रभावी असे चित्रण "खाण माती" या कादंबरीत केले आहे. श्री विठ्ठल गावस यांची 'खाणमाती' ही पहिलीच कादंबरी अक्षर वाङ्मय प्रकाशन पुणे यांनी फेब्रुवारी २०२२ मध्ये प्रकाशित केली. या पुस्तकाला गोवा मराठी अकादमीने प्रकाशन पूर्व अनुदानाने गौरविले. यापूर्वी विठ्ठल गावस यांचे 'लवण', 'ओझे', 'फिंगर बाऊल' यांसारखे कथासंग्रह वाचनात आले होते. या कथांमधून त्यांनी निसर्गसंपन्न गोव्यामध्ये शहरीकरण व पर्यटन यामुळे होणारे बदल, वाढलेली चंगळवादी संस्कृती, भ्रष्ट राजकारण यांमुळे गोव्यातील संस्कृतीचा नैतिक मूल्यांचा होत चाललेला ऱ्हास यांचा बारकाईने मागोवा घेतला होता . गोव्यासारख्या निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या भूमीत खाणकंपन्यांच्या अतिक्रमणामुळे येथील शेतकऱ्यांनाच आपल्या पारंपरिक शेतीला मुकावे लागले, एवढेच नव्हे तर खाणीतून उपसली जाणारी लाल माती शेतात वाहून आल्याने शेतजमिनी नापीक झाल्या. विहिरी व पाण्याचे स्त्रोत आटले, बागायती उध्वस्त झाली. बेकारी व व्यसनाधिनतेमुळे तरुणपिढी उध्वस्त झाली याचेच विदारक चित्र 'खाणमाती' या कादंबरीत घडवले आहे.

सत्तरी या डोंगरप्रदेशातील सोनुर्ली गावचा उच्चशिक्षित बाबल ही या कादंबरीतील केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. खरतर कृषिसंस्कृतीमध्ये रमणारी, शेती, बागायती करत सुखा-समाधानाने जगणारी अनेक माणसे निसर्गसंपन्न खेड्यामध्ये आहेत. उच्चशिक्षण घेतलेल्या तरुण पिढीला मात्र नोकरीसाठी खेडे सोडावे लागते. तरीही मनाने त्यांची नाळ त्यांच्या मातीशी घट्ट जोडलेली असते हे बाबल या प्रातिनिधिक पात्राच्या मानसिकतेतून लक्षात येते.

जेव्हा पंचक्रोशीतील पाच-पंचवीस गावांमधील जमिनी खाणकंपन्या सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून ताब्यात घेऊ लागतात तेव्हा संघर्ष सुरु होतो. हा संघर्ष कौटुंबिक, सामाजिक व राजकीय पातळीवरील संघर्ष आहे. विठ्ठल गावस यांनी तो मोठ्या ताकदीने रेखाटला आहे. जमिनीसाठी मिळणारा दामदुप्पट रोख पैसा कुठल्याही तरुणाला मोहात पाडणाराच असतो. तो मिळविण्यासाठी कौटुंबिक कलहातून सुरुवात होते. अचानक हातात आलेला पैसा तरुणांना व्यसनाधीनतेकडे घेऊन जातो. काही तरूण हातात आलेला पैसा पाहून 'पात्राव' होण्याची स्वप्न बघू लागतात. त्यासाठी दामदुप्पट कर्ज काढून ट्रकही घेतात पण त्यातही पुढारी मंडळींचे वा खाणमालकांचेच ट्रक खनिजाची वाहतूक करण्यासाठी लावले जातात, त्यामुळे कर्जाचे हप्ते

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

फेडण्याइतकेही उत्पन्न तरुण मिळवू शकत नाहीत. कर्ज मंजूर करणारे बँक अधिकारी, स्थानिक पातळीवरील सरपंच आदि मंडळींनीच ट्रक घेण्यासाठी कर्ज काढू इच्छिणाऱ्या तरुणांकडून लाच मागणे असे घृणास्पद प्रकारही पाहायला मिळतात.

सुशिक्षित बाबल आपली जमीन न विकण्याबाबत ठाम असतो. पण सरकारकडून लँड अक्विझेशन नोटिस पाठविली जाते, खाण कंपन्यांच्या मालकांकडून शेतावर जाण्याची वाटच बंद करून त्याची कोंडी केली जाते. बाबलचा संघर्ष हा भांडवलशाही विरुद्ध स्थानिक नागरिक(भूधारक) असा आहे. प्रामाणिकपणे नोकरी करू इच्छिणाऱ्या, प्राध्यापक होऊ इच्छिणाऱ्या बाबलला पात्रता असून, मुलाखतीत निवड होऊनही दोन लाख रुपये शिक्षणसंस्थेत भरावे लागतात. तेव्हा बाबल गोरगरीब व मागास मुलांसाठी शिक्षण देणाऱ्या खारबांदोड्याच्या संस्थेत काम करण्याचा निर्णय घेतो.आपले अध्यापनाचे काम चोख बजावत असताना केवळ तो पांढरपेशा नोकरीमुळे प्राप्त झालेले सुरक्षित आयुष्य जगण्याचे नाकारत गावकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध उभा रहातो. खाणीमुळे कृषी संस्कृतीच्या व समृद्ध अशा पर्यावरणाच्या मुळावर उठलेले प्रदूषण तो सहन करू शकत नाही. केवळ खाण कंपनीच्या सोयीसाठी अनेक वर्षे प्रलंबित राहिलेला पूल तातडीने बांधला जाऊ लागतो तेव्हा प्रथम बाबल गावकऱ्यांना जागृत करत आमदारांच्या सभेत जाहीर निषेध नोंदवतो, त्यापायी तो आपली नोकरी गमावतो. स्वत:च्या भावाचे बिघडत गेलेले वर्तन पाहून त्याच्या जिवाची होणारी तगमग, त्याच्या मृत्यूचा आघात, व्यसनाधीनतेपायी गावातील तरुणांची होणारी वाताहत त्याला अस्वस्थ करत राहते. उध्वस्त होत जाणारा गाव तो भकास नजरेने पहात राहतो. केवळ ही एका तरुणाच्या उमलत्या जीवनाची शोकांतिका नाही तर भांडवलशहा, राजकारण्यांना हाताशी धरून समृद्ध अशा निसर्गाचे व माणसाचे शोषण कसे करत आहेत त्याचे एक विदारक चित्र या कादंबरीत लेखकाने अतिशय गांभीर्याने रेखाटले आहे. खाण कंपन्यांचा कावेबाजपणा कंपन्यांनी गावकऱ्यांना त्यांचे ट्रक खाणीवर लावले जातील असे आश्वासन देऊनही ऐनवेळी आपलेच ट्रक कामाला लावणे, शैक्षणिक सुविधेऐवजी देऊळ बांधून लोकांना खुश ठेवण्याचे, जमिनी ताब्यात घेतल्यावर त्यांना पंचपक्वान्नांचे जेवण घालण्याचा कुटिल प्रयत्न,

बाबलचा भाऊ धाकला व धाकल्याला आपल्या कहयात ओढणारा विश्वास उर्फ इशू या व्यक्तिरेखा देखील लेखकाने सशक्तपणे उभ्या केल्या आहेत. आपली जमीन खाणमालकांना विकून हातात सहज खुळखुळणारे लाखो रुपये अतीव कष्ट करून संसार करणाऱ्या लोकांनी कधी पाहिले नाहीत. ट्रक सारखे महागडे वाहन खरेदी करून आपण पात्राव (पुष्कळ पैसा मिळविणारे व्यावसायिक) बनू शकतो हे जेव्हा तरुणांच्या लक्षात येतं तेव्हा वाढत्या वयात वाढणारी कामवासना आणि पोटाची भूक, त्याची तृप्ति करण्याऱ्या शहरातील विविध सुविधा, दारूच्या गुत्त्यातील एका वेगळ्याच विश्वात नेणारा कैफ त्यांना जमीन विकून पैसा मिळवायला भाग पाडतो. अर्थात त्यासाठी ते जमिनीत अहोरात्र राबणाऱ्या आपल्या बापजाद्यांवर दबाव आणतात. ट्रक खरेदीत होणारी फसवणूक, कर्जाचा वाढता डोंगर, खाणकंपन्यांचा बेबनाव आणि वाढती व्यसनाधिनता यात पूर्ण पिढी बरबाद होते. याचे नेमके चित्र लेखक या व्यक्तिरेखांच्या

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

मानसिकतेतून वर्तनातून दाखवून देतो. इशू व धाकला हे भांडवलशाही संस्कृतीचे बळी आहेत.

गोव्यासारख्या कोकणी संस्कृतीतील सण उत्सव साजरे करण्याच्या रीतीपरंपरा,(गणेशोत्सव, चवथ, देवाची फुगडी, घुमट वादन, गौळण गायन, नाचगाणी) शेतीतील अनेक प्रकारची कामे,(माटवातील धार्मिक विधी, वायंगणातील मळणी, कुत्तेल, वारे करणे,कोंगे करणे) धान्य हातात आल्यावर गावगाडयातील प्रत्येकाचा वाटा त्याला मानाने देणारा बळीराजा, जमिनीबद्दलनेहमी कृतज्ञ असणारा तिच्यावर, पशूधनावर नितांत प्रेम करणारा शेतकरी, शेतीतील कामे, तेथील खाद्य संस्कृती,(सांन्ना, पायस,मुगागाठी आणि वडे,नेवरी,पावलेश्वराला कोंबडा व शागुतीचा नैवेद्य) कोकणातीलअठरापगड जनजाती त्यांचे परस्परांशी असणारे सौहार्द्रपूर्ण संबंध या सर्वांचे दर्शन घडविणारी कोकणी बोली कादंबरीचे अनुभवविश्व संपन्न करते.

निष्कर्ष:-

१. लेखक श्री विठ्ठल गावस सातत्याने गोव्यातील बदलत्या संस्कृतीचा, पर्यावरणीय ऱ्हासाचा, घसरत चाललेल्या मानवी जीवनमूल्यांचा पर्यटन व खाण उद्योगामुळे होणाऱ्या नागरी जीवनाच्या विनाशाचा बारकाईने व कळकळीने वेध घेताना दिसतात.

अशाच प्रकारचे चित्र गोव्यातील लेखक गजानन देसाई यांनी आपल्या ओरबिन या कादंबरीत रेखाटले होते. तेही तितकेच विदारक आहे. मंगेनीजच्या खाण उद्योगामुळे गोव्यासारख्या निर्सगसंपन्न भूमीचे झालेले विद्रूप दोन्ही लेखकांनी पोटतिडकीने आपल्या साहित्यकृतींतून मांडले आहे.

२. लेखक श्री विठ्ठल गावस यांनी खाण उद्योगाबरोबरच महानगरीकरण, शहरांकडे विस्थापन, पर्यटन व राजकारण यामुळे पोखरून गेलेली नागरसंस्कृती अनेक अंगांनी आपल्या लवण' ओझं, फिंगर बाऊल' यांसारख्या कथासंग्रहांतील कथांमधूनही चित्रित करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे.

३. कादंबरीच्या अखेरीस एका कृषिसंस्कृतीवर आक्रमण केलेल्या औद्योगिक संस्कृतीने मागे काय ठेवले याचा विचार केला तर या याची भीषणता अधिक लक्षात येते. खाणीतून भात शेतीच्या आगरांमध्ये वाहत आलेल्या खनिजयुक्त तांबड्या मातीमुळे जमिनी नापीक होतात. शेतकऱ्याला उजाड झालेल्या जमिनीकडे भकास नजरेने पहावे लागते.

४. विठ्ठल गावस यांनी कादंबरी हा साहित्यप्रकारदेखील लीलया हाताळला आहे. अर्थात मनापासून काही सांगण्याची कळकळ, सत्ता आणि संपत्तीच्या हव्यासापोटी माणसानेच उध्वस्त केलेले ग्रामीण जीवन पाहून होणारे अतीव दु:ख 'खाणमाती' या कादंबरीत ओघवत्या शैलीत प्रतिबिंबित झाले आहे.

Dr. Phatak V.S. (2023). 'खाणमाती'(विठ्ठल गावस): मन विषण्ण करणारे वास्तव. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 157–159). AMIERJ. https://doi.org/10.5281/zenodo.10695196